असिमत स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रकरणी विचार
वयोमर्यादेची अट काढून टाकण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-पीओएस-११९५/१५४२/प्र.७८/९५/स्वासैक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक- ३.११.१९९५

शासन निर्णय:- शासन निर्णय क्रमांक-पीओएस-१०९१/प्र.क्र.१०५/स्वासैक, दिनांक ५ सप्टेंबर, १९९२ अन्वये स्वातंत्र्य सैनिकांच्या पेन्शनसाठी अर्ज करणाऱ्या "अर्जदाराचे वय कमीतकमी १६ वर्षे असावे" असे विहित करण्यात आले आहे. दिनांक ३१.१०.९५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार १६ वर्षे वयाची अट काढून टाकण्यास शासन याद्वारे मंजुरी देत आहे.

मात्र अर्जाच्या गुणवत्तेनुसार विचार करण्यासाठी असे अर्ज जिल्हा मानधन समितीच्या अभिप्रायासह शासनाकडे निर्णयासाठी पाठवताना इतर आवश्यक बाबींची अर्जदाराकडून पूर्तता होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( आदेश फातरपेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष/सभापती/सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मुंबई,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
सर्व प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग(का.२५), मंत्रालय, मुंबई-४०००३२,
वित्त विभाग(व्यय-४)मंत्रालय, मुंबई,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
संचालक, माहिती व जनसंपर्क(प्रसिद्धीपत्रक काढण्यासाठी)मुंबई
अवर सचिव, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली(पत्राने)
निवड नस्ती.